कोकणसाद
www.kokansad.com

मंगळवार, दि. १९ जुलै २०२२



दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात वृक्षारोपण करताना पर्यावरण तज्ज्ञ राजेंद्र केरकर, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रा. दिलीप बर्वे, प्रा. डॉ. राजेंद्र इंगळे व इतर.

# हळबे महाविद्यालयात वृक्षारोपण; वनौषधी वृक्षांची लागवड

**कोकणसाद वृत्तसेवा**

**दोडामार्ग** : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महाविद्यालय परिसरात वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण तज्ज्ञ, राष्ट्रीय पातळीवर पर्यावरण चळवळीत काम करणारे व महाविद्यालयाच्या स्थानिक विकास समितीचे सदस्य राजेंद्र केरकर यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात ३० वनौषधी वृक्षांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत होते. यावेळी व्यासपीठावर एन. एस. एस. विभाग प्रमुख प्रा. दिलीप बर्वे व प्रा. डॉ. राजेंद्र इंगळे उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानातून प्रा. केरकर यांनी पर्यावरणाचे महत्व व झाडांचा परिचय करून दिला. प्राचीन काळापासून माणसाचे पर्यावरणाशी असलेले नाते, भारताचा इतिहास त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला. आपल्या व्याख्यानात त्यांनी विद्यार्थ्यांना ११ झाडे लावून ती जतन करण्याचे आवाहन केले. स्वतः राजेंद्र केरकर यांनी ३० झाडे देऊन विद्यार्थ्यांवर त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी दिली.

अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी वृक्षांचे मानवी जीवनातील महत्व, पर्यावरणाचे संवर्धन करण्याची संपूर्ण जबाबदारी तरुण विद्यार्थ्यांची असल्याचे नमूद केले. प्रास्ताविकातून प्रा. दिलीप बर्वे यांनी कार्यक्रमाचा हेतू कथन केला. यावेळी मोठया प्रमाणात विद्यार्थी, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनल गवस हिने तर आभार प्रा. डॉ. राजेंद्र इंगळे यांनी मानले.